## प्राच्यविद्या संशोधक कै. प्रि. वैजनाथ काशिनाथ राजवाडे
# यांचा जीवनपट

राजवाडे आडनाव असलेले लोक हे मूळचे शांडिल्यगोत्री जोशी आडनावाचे चित्तपावन ब्राह्मण होत. पूर्वी हे घराणे कोकणातले रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यात गोळवली गावाजवळच्या 'राजवाडी' या खेड्यातले रहाणारे होते. या 'राजवाडी' गावातून एक जोशी संगमेश्वर तालुक्यातल्याच देवरूख पासून ११ कि.मी. 'निवे' या गावी जाऊन स्थायिक झाला. त्यास लोक 'राजवाडी जोशी' असे संबोधू लागले. पुढे यापैकी एक 'तिमाजीपंत' नामे गृहस्थ छत्रपती शिवाजी महाराज यांचे पदरी महालाकडील कामकाज पहाण्यानिमित्ते रूजू होते, त्यास महाराजांनी आपुलकीने 'राजवाडे' अशी हाक मारण्यास सुरूवात केली. तेव्हापासून या लोकास 'राजवाडे' असे नाव प्रचारात राहिले, अशी शांडिल्यगोत्री जोशी कुलवृत्तांत - राजवाडे उपविभाग यानुसार माहिती मिळते.

या मंडळींचा कुलस्वामी 'केशवराज' याचे मंदीर असूद गावाच्या डोंगरमाथ्यावर आहे. हे असूद गाव पोस्ट-मुरूड, ता-दापोली, जि. रत्नागिरी या ठिकाणी आहे. कुलस्वामिनी 'योगेश्वरी' हिचे मंदीर अंबेजोगाई, बीड या ठिकाणी आहे.

राजवाडे पूर्वी निव्याचे खोत होते. या राजवाडे घराण्यात अनेक थोर पुरूष होऊन गेले, पैकी दिवाणबहादूर रावराजे सर दिनकरराव रघुनाथराव राजवाडे-ग्वाल्हेर संस्थान, अहिताग्नी शंकर रामचंद्र राजवाडे, इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे, इ.

वैजनाथ यांचा जन्म २७ फेब्रुवारी १८६० (फाल्गुन शुद्ध ५ शके १७८१) सोमवार रोजी, कोकणातले गाव वरसई, ता. पेण, जिल्हा रायगड येथे आजोळी झाला. वडील काशिनाथ हरी (ज. १८२६- मृ. १८६७). आईचे नाव यमुना (ज. १८३३-मृ.१९००) माहेरचे आडनाव छत्रे.

वैजनाथ यास एक बहीण होती. बहिणीचा विवाह पुण्यातल्या विनायकराव रानडे यांचेशी झाला होता. यांचा एक मुलगा महादेव विनायक रानडे यांस रँड खून खटला प्रकरणात हुतात्मा चाफेकर बंधूंबरोबर द्रवीड बंधूंच्या खुनात साथीदार म्हणून १० मे १८९९ रोजी येरवडा (पुणे) येथे फाशी दिली गेली.

या शिवाय लहान बंधू विश्वनाथ काशिनाथ (ज. २४ जून १८६३-मृ. ३१ डिसेंबर १९२६), हे पुढे थोर भाषाशास्त्रज्ञ व ज्येष्ठ वैय्याकरणी झाले आणि इतिहास संशोधनाचे घोर, खडतर व्रत स्वीकारून, स्वदेश-स्वभाषा-स्वधर्म या तीन स्वकारांची शिकवण आणि

पुरस्कार करत तपस्वी जीवन जगले. ते संध्या करीत त्यावेळी आपल्या पूर्वजांचे नावांऐवजी तीन महापुरुषांची नावे उच्चारत १. छ. शिवाजी महाराज, २. समर्थ रामदास स्वामी, ३. थोरले माधवराव पेशवा आणि म्हणत या तीन महापुरुषांमुळे आज जो काही आहे हा महाराष्ट्रधर्म राहिला.

वैजनाथ यांचे वयाचे सातव्या वर्षीच पितृछत्र हरपले. त्यामुळे मुक्काम कधी आजोळी तर कधी वडगावी चुलत्याकडे असे. बहुतेक प्राथमिक शिक्षण वरसई येथे व माध्यमिक शिक्षण अलिबाग येथे १८६५ ते १८७५ पर्यंत झाले. पुढे १८७५ साली आई व धाकट्या विश्वनाथ यांचेसह; राजमाचीकर यांचे वाड्यासमोर, धारप वाडा, मेहुणपुरा, शनिवारपेठ, पुणे येथे जागा भाड्याने घेऊन मुक्कामास आले व पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूल मधून १८७६ साली मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांचे हस्ताक्षर अतिशय सुरेख होते.

यानंतर पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन प्रि. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचे मार्गदर्शनात १८८३ मध्ये बी.ए. पदवी मिळविली. १८८४ मध्ये याच डेक्कन कॉलेजमध्ये दक्षिणा फेलोशिप म्हणून नेमणूक. धाकटा भाऊ विश्वनाथ यास डेक्कन कॉलेजमध्ये प्रवेश देऊन त्याचे बी.ए. पदवी मिळेपर्यंत शिक्षण पूर्ण करण्यास सर्वतोपरी सहाय्य केले. पुढे मुंबईस विल्सन कॉलेजमधून १८८५ साली एम.ए.पर्यंतचे स्वतःचे शिक्षण पूर्ण केले. इंग्लिश भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते. एकदा एका इंग्रजी शब्दाच्या उच्चारावरून वाद झाला. डेक्कन कॉलेजला तेव्हा ब्रिटीश प्राध्यापक होते. त्यांनी वैजनाथ यांचेपेक्षा वेगळेच उच्चार सांगितले तेव्हा वैजनाथ यांनी सरळ ऑक्सफर्ड येथे पत्र लिहून आपल्या उच्चाराबाबत खुलासा व नेमका उच्चार काय अशी विचारणा केली. वैजनाथ यांनी सांगितलेला उच्चारच अचूक असल्याचे उत्तर आले होते.

१८८४-८५ या सुमारास वैजनाथ यांचा विवाह -पत्नी - गंगा (ज. १८६७ - मृ. १९२६)

१८८४ साली 'द डेक्कन एज्युकेशन सोसायटी' ची आणि १८८५ साली फर्गसन कॉलेजची स्थापना आगरकर, टिळक व नामजोशी या त्रयीने केली. वैजनाथ यांनी १८८५ पासूनच संस्थेचे आजीव सभासदत्व स्वीकारले. सोसायटीच्या आजीव सभासदाला किमान वीस वर्षे तरी आपल्या आर्थिक उत्कर्षाचा विचार सोडावा लागत असे, असा नियम होता.

पुण्यातील पंचहौद मिशन येथे गोऱ्या मिशनरी साहेबांबरोबर सामाजिक चर्चेनिमित्त लो. टिळक, आगरकर यांचेसह उपस्थित राहिलेल्या सदस्यात वैजनाथही सहभागी होते. या बैठकीला उपस्थित राहिलेल्या या सर्वांनी गोऱ्या मिशनरी साहेबांबरोबर केलेल्या चहा/अपेय पान याबद्दल प्रायश्चित्त घ्यावे म्हणून 'चहा ग्रामण्य प्रकरण' वर्तमान पत्रातून भरपूर प्रसिद्धी देत गोपाळराव जोशी या गृहस्थानी गाजविले. या प्रसंगी वैजनाथ यांनी प्रायश्चित्त घेण्यास स्पष्टपणे नकार दिला होता. सर्वसाधारणपणे वैजनाथ हे कोणत्याही राजकीय हस्तक्षेपापासून अलिप्त रहात.

१८८६ चे सुमारास वैजनाथ हे दयाराम जेठमल सिंध कॉलेज, कराची येथे संस्कृत आणि इंग्रजी चे प्राध्यापक म्हणून चांगल्या वेतनावर रूजू झाले. त्या समयी प्रि. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनी वैजनाथ यास उपयोगी पडावे म्हणून शिफारस पत्र दिले होते. येथे त्यांनी १८९५ पर्यंत सेवा केली.

या काळात आपल्या वयोवृद्ध व दृष्टी क्षीण झालेल्या आईकडे विश्वनाथ याने नीट लक्ष द्यावे अशी वैजनाथ यांची अपेक्षा होती, परंतु जात्याच अत्यंत खोडकर व हूड स्वभावामुळे विश्वनाथ याने आपल्या आईची अत्यंत हेळसांड केली. परिणाम स्वरूप या माऊलीला वेड लागले. यामुळे दोघा भावांत काहीसा अबोला होता.

'निबंधमाला' कार विष्णुशास्त्री चिपळूणकर हे विश्वनाथ यांचे आदर्श व्यक्तिमत्त्व होते, त्यांचे विचारांनी विश्वनाथ यांचे साऱ्या आयुष्यालाच कलाटणी मिळाली. अतिप्राचीन महानुभावपंथाच्या पोथीमधील अनाकलनीय सांकेतिक भाषेचा उलगडा अनेक विद्वजनांस होत नव्हता. त्याचे स्पष्ट लिप्यांतर विश्वनाथ यांनी लीलया करून दाखविल्यावर सर रा. गो. भांडारकर यांनी 'अलौकिक, प्रगल्भ बुद्धिमत्ता' असे त्यांचे कौतुक केले होते. स्वत: वैजनाथ यांना आपल्या धाकट्या बंधू विश्वनाथ यांची संशोधन प्रतिभा व अद्वितीय विद्वत्ता याचा सार्थ अभिमान होता.

दोघेही बंधू आपआपल्या विद्याव्यासंगात मग्न असत, कधी एकत्र बसून निवांतपणे या दोघा सख्ख्या भावांनी सुखदु:खाच्या गोष्टी केल्या नसतील. परंतु परस्परांविषयी नितांत आदर होता. वैजनाथ यांनी काही आर्थिक मदत कारणाने पैसे पाठविले तर विश्वनाथ सवड होताच हिशोब चोख लिहून पाठवत असत, त्यात वैयक्तिक उपभोगाच्या खर्चाचा लवलेश नसे.

वैजनाथ हे संस्कृत आणि इंग्रजी भाषांचे गाढे पंडीत होते. पुढे डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या फर्गसन कॉलेज मध्ये प्रा. वासुदेवराव केळकर यांचे मृत्युनंतर कॉलेजला या भाषां शिकविण्यास वाकबगार प्राध्यापकाची गरज निर्माण झाली. सबब सोसायटीचे अध्यक्ष ना. गोपाळ कृष्ण गोखले यांनी त्याबाबत आपण ती जबाबदारी स्वीकारावीत असा आग्रह केल्यामुळे वैजनाथ यांनी कराची येथील डी.जे. सिंध कॉलेजच्या मोठ्या किफायतशीर नोकरीचा १८९६ साली राजीनामा दिला आणि मोठा आर्थिक त्याग करीत ते कराची सोडून संस्था कार्यासाठी पुण्यास धावून आले.

इंग्रजी शिकवताना आपण एक परकी भाषा शिकवत आहोत याचे पक्के भान वैजनाथांना असे. केवळ पुस्तकी शिकवण्यावर भागणार नाही, तर जो लेखक शिकवत उदा. चार्लस डिकन्स - त्याच्या काळातल्या सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ, परिस्थिती, रीतीभाती, संकेत अशी संबंधित माहिती सांगत. विषय सर्वांगाने समाजावा अशी तळमळ असे. संस्कृतबद्दल तर प्रश्नच नव्हता. प्रा. ना. सी. फडके, प्रा. विश्वनाथ जोग हे राजवाडे यांचे प्रथम विद्यार्थी व नंतर सहाध्यापक. फडके यांनी आपल्या आत्मचरित्रात वैजनाथांबद्दल त्यांच्या शिकवण्याविषयी अत्यंत गौरवपूर्ण लिहिले आहे. वैजनाथ यांचे दोन्ही भाषांवर प्रभुत्व होते. एवढेच नव्हे तर मुळात ते सच्चे वाङ्मयप्रेमी होते. रॅशनॅलिस्ट असोसिएशनचे पाक्षिक, लिटररी रीव्ह्यू गाईड ते नियमित वाचत. बहुधा ते त्याचे आजीव वर्गणीदार असावेत. रॅशनॅलिस्ट असावेत, ते त्यांच्या वागण्यात बिंबित होई. साहित्यिक घडामोडींची, कुठे काय प्रकाशित होतेय, याबाबत उत्सुकतेने, जागरूकतेने माहिती करून घेत.

महर्षी अण्णासाहेब कर्वे यांनी र.पु.परांजपे यांना इंग्लंडला पाठवून शिकून येण्यासाठी उत्तेजन व

बहुमोल सहाय्य दिले. परांजपे यांनी रँग्लरचा बहुमान मिळवून त्याचे चीज केले. महर्षी अण्णासाहेब कर्वे इथे गणित शिकवत त्यामुळे बाया कर्वे यांचेही राजवाडे यांचे कुटुंबाकडे येणे-जाणे असे. या काळात त्यांचे वास्तव्य फर्गसन कॉलेजच्या आवारातल्या बंगल्यात होते. पत्नी गंगाबाई या दमेकरी होत्या. त्यांचेकडून फार काम होत नसे पण वैजनाथ कधी त्रागा न करता हे सारे सांभाळून घेत. त्यांनी आपल्या आईसही आपल्या जवळ ठेवून तिची सर्वतोपरीने काळजी घेतली. वैजनाथ तिला नेमाने दररोज संध्याकाळी हाताला धरून जवळच्या देवळात नेऊन आणत. वेडाचे भरात आई वाटेत दिसणाऱ्या, भेटणाऱ्या कोणालाही अपशब्द करी, त्यामुळे त्यांची फार पंचाईत होत असे. पण आईसाठी ते सर्व सहन करीत. या त्यांच्या सायंफेरीत कधी खंड पडला नाही आणि एके दिवशी आई यमुनाबाईचे १९०० साली फर्गसन कॉलेजच्या आवारातल्या बंगल्यातच निधन झाले.

पुढे कालांतराने ना. गोपाळ कृष्ण गोखले १९ सप्टेंबर १९०२ रोजी डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या आजीव सभासदत्वाचा त्याग आणि फर्गसन कॉलेजच्या प्राचार्यपदाचा राजीनामा देऊन संस्थेतून निवृत्त झाले व त्यांनीच स्थापलेल्या 'सर्व्हंटस इंडिया सोसायटी' च्या कार्यासाठी बाहेर पडले.

Farewell to Fergussion College या त्यांच्या निरोपाच्या भाषणातील एक वाक्य येथे उद्धृत करावेसे वाटते - "There are other institutions better equipped and also with older traditions; but the self-sacrifice of my friend Mr. Rajwade surrounds this college with a halo of glory all its own".

त्यांचे जागी आलेले प्रि. महादेव शिवराम गोळे हे दीर्घ मुदतीचे रजेवर गेले.

या काळात आजीव सभासदांपैकी सेवाज्येष्ठतेनुसार वैजनाथ राजवाडे व आजीव सभासदांपैकी सर्वात कनिष्ठ परंतु नुकतेच इंग्लंडहून रँग्लर पदवी घेऊन परतलेले र.पु.परांजपे यापैकी कोणास कॉलेजचा प्राचार्य नेमावे या विषयी सोसायटीच्या आजीव सभासदांमध्ये वादंग झाला. संस्थेच्या नियामक मंडळाने सेवाजेष्ठता डावलून कॉलेजचा प्राचार्य म्हणून रँ.र.पु.परांजपे यांची १९०२ साली निवड केल्यावर जेष्ठता असूनही वैजनाथ यांनी उपप्राचार्य पद स्वीकारले आणि शिवाय सोसायटीचे सचीवपदी राहून प्राचार्यांना सर्वतोपरी सहकार्य दिले. या झाल्या प्रकाराचे वैजनाथ यांना सुरुवातीस जरी थोडे वैषम्य वाटले तरी त्यांनी मंडळाचा निर्णय सहजपणे मानला.

परंतु पुन्हा अशा प्रकारांची पुनरावृत्ती होऊ लागली, जणू डेक्कन एज्युकेशन सोसायटीत हा पायंडाच पडल्यासारखा झाला. प्रा. जोग यांना डावलून रँ. महाजनींना प्रिन्सिपॉल केले गेले, न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शंकरराव कानिटकर यांना डावलले गेले. अनेक सदस्यांना हे रुचले नाही. प्रा. जोग, प्रा. सुरू, प्रा. खाड्ये ही मंडळी गुणवत्तेत यत्किंचित कमी नव्हती. ते बाहेर पडले व त्यांनी वाडिया कॉलेज सुरू केले. कानिटकर यांनी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली व मॉडर्न प्रायमरी स्कूल आणि हायस्कूल सुरू केली.

पंडित मदनमोहन मालवीयजी आणि वैजनाथ यांचा घनिष्ठ परिचय होता. मालवीयजींनी

वरील घटनाक्रमानंतर वैजनाथांनी बनारस हिंदू विश्वविद्यापीठात यावे अशी विनंती करून रु. १५००=०० वेतन देऊ केले होते. परंतु वैजनाथांनी हे पद कृतज्ञतापूर्वक नाकारले आणि कळवले मी डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा आजीव सभासद आहे. मी तेथेच काम केले पाहिजे. अन्यथा आजीव सभासदत्वाला अर्थ काय राहिला?

प्राचार्यपदी रँ.परांजपे यांच्या कार्यकालात कॉलेजच्या विद्यार्थ्यांची संख्या ३०० वरून वाढून १२०० पर्यंत पोचली. राजवाडे सेवानिवृत्त होण्यापूर्वी त्यांना प्रिन्सिपॉलपदी येता यावे म्हणून १० वर्षे पूर्ततेनंतर रँ. परांजपे यांनी प्रिन्सिपॉलपदाचा राजीनामा देण्याची इच्छा वैजनाथ यांचे पाशी व्यक्त केली व म्हणाले तुम्हाला निवृत्तीला अजून दोन वर्षे बाकी आहेत तर आता तुम्ही प्रिन्सिपॉलपदी या, त्याचा तुम्हाला निदान पेन्शनच्या दृष्टीने तरी उपयोग होईल. परंतु आपल्या दिलदार स्वभावाला अनुसरून वैजनाथ यांनी या संकल्पाचा साफ इन्कार केला. उलट म्हणाले, ''तुमच्या नेतृत्वाखाली संस्थेने भरपूर प्रगती केली आहे. आणखी काय हवे? मी हे पद कशाला घेऊ? तुम्हीच हे कार्य चालवीत रहावे.'' ''अन्याय झाला असल्याच्या जाणीवेमुळे त्यांना प्रारंभी वाटलेल्या विषादाचा नंतर मागमूसही राहिला नाही. हरघडी त्यांचे मला फारच सहकार्य मिळत राहिले. राजवाडे कराची सोडून संस्था कार्यासाठी पुण्यास धावून आले यात त्यांनी फार मोठा स्वार्थत्याग केला हे नि:संशय आहे.'' असे स्वत: रँ. परांजपे आपल्या 'नाबाद ८९' या आत्मवृत्तात नमूद करतात.

वैजनाथ कामाने झपाटलेले असत. वक्तशीरपणाचे भोक्ते होते. कॉलेजमध्ये सकाळी शिकवत. कॉलेज संपल्यावर टांग्याने नानावाडा शाळेत जायचे. काही वर्षे त्यांना नानावाडा शाळेचे पर्यवेक्षक म्हणून काम पहावे लागले. एकदा गव्हर्नर साहेबांची स्वारी जाणार म्हणून पोलिसांनी वाहतूक रोखून धरली. सबब शाळेत पोचायला उशीर झाला. त्यांनी याविषयी गव्हर्नर साहेबांस पत्र पाठविले. लोक म्हणू लागले - कशाला नसती आफत ओढवून घेताय? तुमच्याच अंगाशी येईल. कायमचा ससेमिरा मागे लागेल. अकारण त्रास भोगावा लागेल आणि लवकरच एके दिवशी त्यांच्या निवासाच्या दारात शाही बग्गी येऊन उभी राहिली. लोक कुजबुज करू लागले. बघा, आम्ही सांगितले नव्हते? परंतु त्या बग्गीतून गव्हर्नर साहेबांनी आपल्या ए.डी.सी. ला पाठवून त्याचे मार्फत दिलगिरी व्यक्त केली होती.

शाळा ११ ते ५ असे. ११ वाजण्यापूर्वी शाळेत पोचण्याचा त्यांचा शिरस्ता होता. ११ वाजता मुख्य प्रवेशद्वार बंद करून ते दिंडी दरवाज्यापाशी उभे रहात. उशीरा येणाऱ्यांना हातावर छडीचा प्रसाद मिळे. एका मुलाला रोज उशीर व्हावयाचा. वैजनाथ कार्यालयात आले, त्या मुलाचे रेकॉर्ड पाहिले, अभ्यासात चांगला होता. मग उशीराचे कारण काय असावे या विचाराने त्यास बोलावून घेतले. चौकशी केली तेव्हा समजले की कोणाच्यातरी आश्रयाने हा मुलगा रहात असे. तेथे त्याच्याकडून भरपूर घरकाम करवून घेतले जाई, यजमानास

उशीराची पर्वा नसे. काही बोलायची सोय नव्हती. निघून जा म्हणाले तर जेवण-खाण्यासह शिक्षणच बंद होणार ही भीती. हे समजल्यावर वैजनाथांनी या मुलाची आपल्या घरी रहाण्याची सोय करविली. हा विद्यार्थी - केशव वि. साने पुढे चांगले शिकून डेप्युटी एज्युकेशन इन्स्पेक्टर झाले. (त्यावेळी काळ्या माणसाला सरकार दप्तरी मिळणारी ही वरच्यात वरची जागा). नंतर त्यांनी आपल्या इतर भावंडांना आधार दिला. सर्वजण शिकून नावारूपाला आले. पुण्यातल्या वास्तव्यात वैजनाथ यांच्याकडे किमान दोन विद्यार्थी तरी शिकायला असत.

असाच एकदा उशीरा आल्याबद्दल छडीचा प्रसाद, शाळेत एक शिक्षक अगदीच पोर सवदे ठेंगणे नव्याने रुजू झाले होते, त्यांनाही मिळाला. इतर शिक्षकांत व कर्मचारीवर्गात कुजबुज सुरू झाली. कोणी एकाने धीर करून वैजनाथास ही माहिती देत विनंती केली की शाळेत निदान विद्यार्थ्यांसमोर शिक्षकास तरी ---झाला प्रकार आणि दृष्टिक्षीणते (पुस्तकाचा कोपरा लागून डोळ्यास झालेली इजा) मुळे झालेली आपली चूक वैजनाथ यांस फार जाणवली. त्यांनी तत्काळ त्या शिक्षकांस बोलावून दिलगिरी व्यक्त केली व त्वरीत सेवामुक्तीचा अर्ज संस्थेकडे पाठविला. ते वर्ष होते १९१४. पेन्शन बसली महिना रु. ७५/-.

वैजनाथ यांना तीन मुले - थोरला चिंतामण (ज. १८८९), मधली मुलगी यमुना (ज. १९०४ पुणे येथे), धाकटा मुलगा माधव (ज. १९०९ पुणे येथे).

मोठा मुलगा चिंतामण फर्गसन कॉलेजमधून पाली - अर्धमागधी व इंग्रजी घेऊन एम.ए. झाला. विनोदी लेखक प्रा. चिं.वि.जोशी, प्रा. अण्णागिरी, पुढे फर्गसनलाच पाली-अर्धमागधी शिकवणारे प्रा.बापट हे त्यांचे सहाध्यायी. हे सर्व पाली भाषेचे प्रा. धर्मानंद कोसंबी यांचे विद्यार्थी.

पुढे फक्त पेन्शन एवढ्या तुटपुंजा उत्पन्नावर, मुलगी यमुना आणि धाकटा मुलगा माधव यांचे शिक्षण व आजारी पत्नीसह, कौटुंबिक निर्वाह करून वैजनाथ त्यांच्या आवडत्या ऋग्वेद संशोधनाच्या कार्याकडे लक्ष देऊ लागले. वेदकाळातली संस्कृत भाषा ही उत्तर काळात प्रचलित असलेल्या संस्कृतपेक्षा फार वेगळी होती असे त्यांच्या लक्षात आले.

पुढे वेदशास्त्रोत्तेजक सभेचे अध्यक्षपद ही त्यांनी भूषविले.

याच सुमारास डॉ. रा.गो.भांडारकर यांचे मृत्युनंतर त्यांचे समृद्ध ग्रंथालय जतन करणे आणि त्यांचे प्राच्यभाषा विषयक संशोधन कार्य पुढे चालू ठेवण्याचे इराद्याने, त्यांच्या शिष्य गणांनी एकत्र येऊन 'भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदीर' (Bhadarkar Oriental Research Institute) या नावाने संस्था स्थापन केली. वैजनाथ राजवाडे हे या संस्थापकांपैकी एक होते.

थोरला मुलगा चिंतामण यांचा विवाह - नाशिकचे हरी विनायक गोळे यांची कन्या कमला हिचे बरोबर झाला. त्यांची बडोद्याच्या कॉलेजमध्ये इंग्रजी व पाली भाषेचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. यास एकच मुलगा दत्तात्रय (शाम) ज. १ नोव्हेंबर १९१७. चिंतामण यांनी १९१८ साली दीघनिकाय भाग १ व २ या ग्रंथांचे मराठीत भाषांतर प्रसिद्ध केले. तसेच मूळ ग्रंथाच्या भाग २ व ३ चेही एकत्र, सुत्तपिटकातील सूत्रांचा संग्रह, जातीभेद, यज्ञीय हिंसा, ब्राह्मण्य, स्वर्गमालिका इ. विषयांवर संवादात्मक विचार व उपदेशात्मक लेख लिहून प्रसिद्ध केले.

परंतु वैजनाथ यांचे वयाचे साठीत कर्ता थोरला मुलगा चिंतामण यांचा २० मे १९२० रोजी मृत्यु. पाठोपाठ काही महिन्यातच (मार्च १९२१) सून कमला हिचाही मृत्यु. मुलगा व सून यांचे अकाली मृत्युनंतर मागे राहिला नातू - शाम वय वर्षे अडीच.

संकटे येतात ती जणू हातात हात घालूनच. वैजनाथ ज्या बँकेचे संचालक मंडळावर होते ती बँकच बुडाली. त्यात त्यांची स्वत:ची रु. ३५,०००=०० ची ठेव बुडालीच. त्यांच्यासारखी विद्वान, व्यासंगी, प्रसिद्ध, प्रतिष्ठित व्यक्ती संचालकपदी असावी, या भावनेतून त्यांना हे पद सन्मानपूर्वक देण्यात आले होते. वास्तवात बँकेच्या दैनंदिन व्यवहारात, व्यवस्थापनात त्यांचा सहभाग नसे. तरीही ही स्वत:ची नैतिक जबाबदारी मानून त्यांनी पदरचे रु. १०,०००=०० भरले.

वरील दोन्ही घटना निवृत्तीनंतर घडल्या आणि परिस्थिती अधिकच बिकट झाली. वैजनाथ यांचे वर हा मोठा आघात होता.

कुटुंबाचे चरितार्थासाठी निवृत्तीनंतर पुन्हा एकवार वैजनाथ यांना नोकरीनिमित्ताने पुण्याबाहेर जावे लागले. साल होते १९२१. सुरतेच्या 'सार्वजनिक एज्युकेशन सोसायटी' च्या एम.टी.बी.आर्टस कालेजचे प्रिन्सिपॉलपद त्यांनी स्वीकारले. त्यांचेबरोबर प्रा. जोशी, पाळंदे, चंद्रचूड हेही प्राध्यापक म्हणून तेथे गेले. या नवीन कॉलेजची सुरूवातीची घडी बसवण्यासाठी या अनुभवी, नेक मंडळींचा उपयोग करून घेण्यात आला आणि पाच वर्षांची मुदत पूर्ण होताच भव्य सत्कार करून निरोप देण्यात आला. यापैकी कोणालाच अजून येथे राहाणार का,अशी विचारणासुद्धा केली गेली नाही. नंतर संचालक एन.एम.शहा यांनी गुजराथी माणूस प्रिन्सिपॉल म्हणून नेमला. प्रा. पाळंदे, चंद्रचूड इ. मुंबईच्या रूईया कॉलेजला गेले.

ते सुरतला असतानाच त्यांची मुलगी यमुना हिचा विवाह नागपूरच्या सर्जन जनरल कर्नल सर कुकडे यांचा एकुलता एक मुलगा नीळकंठ याचेशी झाला.

साल १९२५ वैजनाथ पुण्यास परतले. १९२५ ते १९३४ या काळात सरदार नीळकंठ बाळासाहेब नातू यांचे वाड्यात वैजनाथ यांचे बिऱ्हाड होते. वीस खण जागेला महिन्याला रु. २४/- भाडे होते.

दरम्यान १९२५ पासून वैजनाथ यांनी 'भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदीर' या संस्थेचे कार्यास वाहून घेतले. येथे ते एम.ए. करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी संस्कृतचे वर्ग घेत. भरपूर संख्येने विद्यार्थी येत. परंतु ते कोणतेही मानधन घेत नसत. असे तीन वर्ष नियमितपणे काम केले, त्यांस अपेक्षा होती की इतके सर्व असल्यावर युनिव्हर्सिटीकडून ऑटोमॅटिक रिन्युअल येईल, तशी पद्धत होती, परंतु रिन्युअल आले नाही. पत्रव्यवहारास पोच सुद्धा आली नाही. त्यांनी शिकवणे थांबविले.

नातू वाड्यात रहायला आल्यावर वैजनाथ यांचे पत्नीची प्रकृती खालावत गेली. एप्रिल १९२६ मध्ये पत्नी गंगाबाई या वयाचे ५९ वे वर्षी निधन पावल्या.

पाठोपाठ काही महिन्यातच वैजनाथ यांस आणखी एक आघात सहन करावा लागला तो म्हणजे त्यांचा धाकटा भाऊ इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचे वयाच्या ६३ व्या वर्षी ३१ डिसेंबर १९२६ शुक्रवार रोजी धुळे येथे आकस्मिक निधन झाले. विश्वनाथ यांचे शिष्य व परम मित्र भा. वा. भट यांनी त्यांचे स्मारक 'इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ' नामे संस्था स्थापन करून केले, त्यास वैजनाथ यांनी वडील बंधू एकमेव वारस या नात्याने त्वरीत संमती दिली आणि स्वहस्ते इमारतीची कोनशिला धुळे येथे हजर राहून बसविली, हा समारंभ २७

डिसेंबर १९२९ रोजी पार पडला.

या पाठोपाठच्या आघातांनी हा कर्मयोगी संसार संन्यास घेतल्यागत राहू लागला. गरजा अगदी किमान ठेवल्या. निव्वळ दूध, साळीच्या लाह्या व उकडलेली पालेभाजी या मितआहारावर ते १९२६ पासून राहिले आणि आपल्या संशोधन कार्यात बुडून गेले. घरात त्यांस 'नाना' म्हणत, इतर परिचित आदराने नानासाहेब संबोधित.

१९३४ चे सुमारास भांडारकर इन्स्टिट्यूट रस्त्यावरील घराचे बांधकाम पूर्ण करवून स्वत:च्या वास्तूत रहायला आले. घर अगदीच साधे होते. संस्थेत जाण्यायेण्यास जवळ पडे. हे घर म्हणजे जणू एक संन्याशाची मठीच होती. बाहेर जाताना दाराला कुलूप लावायचे आणि किल्ली तेथेच वर गजापाशी ठेवून जायचे. पुस्तके, हस्तलिखिते हीच संपत्ती. संध्याकाळी नियमितपणे काठी/छत्री घेऊन फिरायला जात. लोक त्यांच्या जाण्यायेण्यावरून घड्याळ लावून घ्यावे असे म्हणत.

धाकटा मुलगा माधव याने आपले शिक्षण बी.ए.पर्यंत पूर्ण करून प्रथम काही काळ 'न्यू. इं. स्कूल.' पुणे येथे शिक्षक आणि नंतर खडकी दारूगोळा कारखान्यात ॲम्युनिशन इन्स्पेक्टर पदावर नोकरी केली. १९४० चे सुमारास विवाह - पत्नी - शकुंतला - पुणे येथील रामकृष्ण आठवले यांची कन्या. मधल्या सुमारे १५ वर्षे कालखंडात घरात स्त्री माणूस नव्हते.

या सर्व घडामोडीत वैजनाथ यांचे आपला नातू दत्तात्रय ऊर्फ शाम याचे कडेही विशेष लक्ष असे. त्याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण 'न्यू. इं. स्कूल' येथे झाले. एकदा वर्गशिक्षक शामला म्हणाले, ''अरे तू कशाला फी भरतोस? या संस्थेत लाईफ मेंबर्सची मुले फुकट शिकतात. जा हे पैसे घरी परत दे.'' दुसरे दिवशी स्वत: वैजनाथ शाळेत आले व शिक्षकांसमक्ष शामला उद्देशून म्हणाले, 'फी बाबत शिक्षकांचे म्हणणे बरोबर आहे, पण तू माझा कोण? नातू - मुलगा नाहीस, मग तू फी भरली पाहिजे. मी तुला बाकी वह्या-पुस्तके कशाला काही कमी करतो का?'' - शिक्षकांना उद्देश समजला.

शाम मॅट्रिक पास झाल्यानंतर इंटरपर्यंत फर्गसन मध्ये व त्यानंतर तो १९३९ मध्ये बनारस हिंदू युनिव्हर्सिटी येथे गेला. बनारस येथे शिकताना आपल्या शिक्षणाचा/वसतीगृह-मेस चा खर्चाचा भार आपल्या ८० वर्षांच्या आजोबांवर पडतो या जाणिवेने शाम प्रवास खर्चाचा अतिरिक्त भार होऊ नये म्हणून कॉलेजच्या उन्हाळी/दिवाळी सुट्टीतही घरी येणे टाळत असे.

शाम इलेक्ट्रिकल-मेकॅनिकल इंजिनिअरींगची पदवी परीक्षा चांगल्या प्रकारे उत्तीर्ण झाला. १९४४ जुलै महिन्यात निकाल हाती पडला. जणू वैजनाथ यांची शेवटची जबाबदारीही पार पडली आणि १७ डिसेंबर १९४४ रोजी आपल्या वयाच्या ८४ व्या वर्षी या स्वार्थत्यागी विद्याव्यासंगी सद्पुरुषाने या लोकीचा अखेरचा निरोप घेतला.

वैजनाथ यांनी लिहून प्रकाशित केलेल्या ग्रंथास अभ्यासकांकडून देशात परदेशातही मागणी होती. त्यांनी यास्ककृत निरुक्ताचे मराठी आणि इंग्रजी भाषांतर केलेले आहे. यापैकी यास्ककृत निरुक्ताचे मराठी भाषांतर या ग्रंथाची पहिली आवृत्ती १९३५ साली छापण्यास श्रीमंत सरकार नारायणराव गोविंद ऊर्फ बाबासाहेब घोरपडे, अधिपती इचलकरंजी संस्थान यांनी अर्थ सहाय्य

दिले होते, याबाबत कृतोपकाराच्या जाणिवेतून वैजनाथ यांनी हा ग्रंथ त्यांस अर्पण केला होता. इंग्रजी भाषांतर 'Bhandarkar Oriental Research Institute' यांनी छापून प्रसिद्ध केला आणि याशिवाय 'Words In Rgveda' याचा पहिला खंड एवढे आहे. (दुसऱ्या खंडाचे हस्तलिखित तयार झाले होते. या व्यतिरिक्त बऱ्याच लिखाणांचा आता ठावठिकाणा लागत नाही.) आर्थिक अडचणीमुळे स्वत: छापून प्रसिद्ध करू शकले नाहीत.

ज्या 'द डेक्कन एज्युकेशन सोसायटी' साठी त्यांनी फार मोठा स्वार्थत्याग केला आणि विलक्षण आत्मीयतेने कार्य केले त्या संस्थेच्या फर्गसन कॉलेजच्या वाडिया लायब्ररीत वैजनाथ यांचे मोठे पोर्ट्रेट लावलेले होते त्याचाही आता पत्ता लागत नाही. गत १०० वर्षांचा हा काल महिमा!

आजच्या शिक्षण सम्राटांच्या शैक्षणिक क्षेत्राचे वास्तवात हे सारे स्तिमित करते. कोडे वाटते की हा वारसा कुठे आणि कसा गडप झाला?

आणि म्हणूनच आचार्य अत्र्यांना साप्ताहिक 'नवयुग' मध्ये वैजनाथ काशिनाथ राजवाडे यांच्यावर ते हयात असतानाच लेख लिहावासा वाटला. - 'पुण्याचा आदर्श ब्राह्मण'.

कै. नानांपाशी आणखी एक सुप्त कलागुण होता, जो फारच थोड्या जणास माहिती - ते उत्तम सतार वाजवीत. परंतु १९२६ नंतर संन्यस्तवृत्तीने त्यांनी वाद्य वादन बंद केले होते.

*वरील सर्व माहिती माझे वडील कै. दत्तात्रय ऊर्फ शाम यांनी मला वेळोवेळी आपल्या श्रुती स्मृतींस अनुसरून सांगितल्यानुसार लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे कोणाही जीवित अथवा दिवंगत व्यक्तींच्या भावना दुखविण्याचा माझा उद्देश नाही. घटना, काल आणि सत्य-असत्य या बाबत कोठे उणेपणा असल्यास जाणकारांनी माझे ठायी असलेली अल्पमती जाणून घेऊन माफ करावे ही विनंती.*

आनंद दत्तात्रय राजवाडे

२० मे २०१३ कै. नाना यांचा पणतू.